1.1.3. CBCS

# Solapur University, Solapur

**28th meeting minutes of Academic Council**

**Thursday, 13th August 2015 Time: 12 p.m.**

**The 28th meeting of Academic Council was held at 12 p.m. on 13th August 2015**

**This meeting was held under the Presidentship of Honorable Vice Chancellor in the MC Hall of Solapur University, Solapur**

1.2.2 Choice credits (CBCS)

The following members were present for the meeting :

| Sr.No. | Name of the Member | Designation |
|---|---|---|
| 1 | Dr. Maldar N N Vice Chancellor | President |
| 2 | Dr. Pawar NB | Member |
| 3 | Dr. Nimbalkar VH | Member |
| 4 | Principal Dr. Deshmukh LP | Member |
| 5 | Dr. Krishnamurthy Rao | Member |
| 6 | Dr. Shaikh AA | Member |
| 7 | Dr. Shrimati. RangrezA M | Member |
| 8 | Principal Dr. Hulkude SA | Member |
| 9 | Dr. Engale KJ | Member |
| 10 | Dr. Ghatge K B | Member |
| 11 | Dr. Dhabale GS | Member |
| 12 | Dr. Kadam V L | Member |
| 13 | Dr. UbaleVP | Member |
| 14 | Dr. VadagbalkarSK | Member |
| 15 | Dr. Pawar SA | Member |
| 16 | Principal Dr. Patil RR | Member |
| 17 | Dr. Bad DR | Member |
| 18 | Dr. GangajeSR | Member |

D.B.F. DAYANAND COLLEGE OF ARTS & SCIENCE, SOLAPUR

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 19 | Dr. Shrimati. Lonikar MS | Member |
| 20 | Principal Sri. Patil RY, Director, BCUD | Member |
| 21 | Principal Dr. JindaleSB | Member |
| 22 | Principal Dr. ChitteGN | Member |
| 23 | Principal Dr. Shrimati. Wadhwan MA | Member |
| 24 | Dr. Ashok Kumar E N | Member |
| 25 | Dr. Deshmukh MS | Member |
| 26 | Dr. Yegaonkar SD | Member |
| 27 | Dr. Ladgaonkar BP | Member |
| 28 | Principal Dr. Gore SS | Member |
| 29 | Dr. KAMBLE BN | Member |
| 30 | Prof. ZabkeP S | Member |



Scanned by CamScanner

(104 (14))

**For information:** The decision taken by this University in the meeting of JBVC regarding implementation of Choice Based Credit System:

( Report: To take the review of the meeting held on 23rd February 2015 at Raj Bhavan of JBVC the government level meeting was held on 15th may 2015 to implement Choice Based Credit System from the academic year 2015-16 at all Non Agricultural Universities and affiliated colleges.

For the implementation of the aforesaid, Solapur University, Solapur has arranged a meeting on 25th May 2015 at 11 a.m. to 5 pm of principles of all affiliated colleges, chairmen of temporary/ permanent Board of Studies and Deans of all faculties and Directors of all Schools at the University, Teachers and Officers in the University M C hall. Meanwhile, a workshop for the implementation of Choice Based Credit System at postgraduate and undergraduate courses was organized in the University. In this workshop the resource persons where Professor Dr. R. D. Kapale from the School of Earth Sciences, Swami RamanandTeerthMarathwada University, Nanded and from out the state Dr. Y. M. Jayaraj, Ex- professor, from Gulbarga University Gulbarga. They have guided through their powerpoint presentations.

During this workshop it was discussed and decided by the Principles and Chairmen of Board of Studies that it is very difficult to implement Choice Based Credit System since academic year 2015-16 for undergraduate classes because there is CGPA system implemented just from academic year 2014-15. If the Choice Based Credit System is implemented right now, the students and teachers will be confused and the possibly cannot be denied of the anarchy like atmosphere in the teaching learning process. Moreover, because of Technical problem( the rosters are not verified) the posts of teachers at the colleges are vacant. If the students select various subjects from different faculties, there will be shortage of teachers to teach them. And there is only one undergraduate or postgraduate faculty in some of the colleges. In such colleges how to provide choice to the students among the subjects belonging to other faculties is a big question in front of the principles of those colleges. So that, it is mentioned by the present members that implementation of Choice Based Credit System is not possible.

However, our University has decided to implement CBCS pattern at the beginning for University Campus Departments and affiliated colleges at postgraduate courses from academic year 2015-16 and for undergraduate causes from academic year 2016-17. This has been informed to the Government by the University through the letter number SUS/BOS/ 2437 dated 16th June 2015. A copy of the letter sent to the government by the University and the minutes of the workshop held on 25th May 2015 are attached herewith for your reference.

**This, as above, is being circulated for information regarding implementation of CBCS based on the decision taken in the meeting of JBVC.**

| | |
|---|---|
| Resolution | **The note has been taken of the action taken by honorable Vice Chancellor of the University.** |



D.B.F. DAYANAND COLLEGE OF ARTS & SCIENCE, SOLAPUR

Scanned by CamScanner

# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## विद्या परिषदेच्या २८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## गुरुवार, दि.१३ ऑगस्ट, २०१५ दुपारी १२:०० वा.

**विद्या परिषदेची २८ वी बैठक गुरुवार, दि.१३ ऑगस्ट, २०१५ रोजी दुपारी १२:०० वा.** विद्यापीठ सभागृहामध्ये मा. कुलगुरूमहोदय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन. : कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. पवार एन. बी. | सदस्य |
| ३) | डॉ. निंबाळकर व्ही. एच. | सदस्य |
| ४) | प्राचार्य डॉ. देशमुख ए. एल. | सदस्य |
| ५) | डॉ. कृष्णमूर्ती एम. | सदस्य |
| ६) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| ७) | डॉ. श्रीमती रंगरेज ए. एम. | सदस्या |
| ८) | प्राचार्य डॉ. हलकुडे एस. ए. | सदस्य |
| ९) | डॉ. इंगोले के. जे. | सदस्य |
| १०) | डॉ. घाडगे के. बी. | सदस्य |
| ११) | डॉ. धवाले जी. एस. | सदस्य |
| १२) | डॉ. कदम व्ही. एल. | सदस्य |
| १३) | डॉ. उबाळे व्ही. पी. | सदस्य |
| १४) | डॉ. वडगबाळकर एस. के. | सदस्य |
| १५) | डॉ. पवार एस. ए. | सदस्य |
| १६) | प्राचार्य डॉ. पाटील आर. आर. | सदस्य |
| १७) | डॉ. बाड डी. आर. | सदस्य |
| १८) | डॉ. गेंगजे एस. आर. | सदस्य |
| १९) | डॉ. श्रीमती लोणीकर एम. एस. | सदस्या |
| २०) | प्राचार्य श्री. पाटील आर. वाय., संचालक, म. व वि. वि. मंडळ | सदस्य |
| २१) | प्राचार्य डॉ. जुंदळे एस. बी. | सदस्य |
| २२) | प्राचार्य डॉ. चिट्टे जी. एन. | सदस्य |
| २३) | प्राचार्या डॉ. श्रीमती वडवान एम. ए. | सदस्या |
| २४) | डॉ. अशोककुमार ई. एन. | सदस्य |
| २५) | डॉ. देशमुख एम. एस. | सदस्य |
| २६) | डॉ. येळेगावकर एस. डी. | सदस्य |
| २७) | डॉ. लाडगावकर बी. पी. | सदस्य |
| २८) | प्राचार्य डॉ. गोरे एस. एस. | सदस्य |
| २९) | डॉ. कांबळे बी. एन. | सदस्य |
| ३०) | प्रा. झपके पी. सी. | सदस्य |



D.B.F. DAYANAND COLLEGE OF ARTS & SCIENCE, SOLAPUR

Scanned by CamScanner

**[१०४(१४)] प्रस्तुत विद्यापीठाने जे.बी.व्ही.सी.च्या बैठकीतील निर्णयांच्या अनुषंगाने निवड आधारित श्रेयांक प्रणाली (Choice Based Credit System) लागु करण्यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची बाब माहितीस्तव.**

(टिपणी: दि.२३/०२/२०१५ रोजी राजभवन येथे झालेल्या जे.बी.व्ही.सी.च्या बैठकीतील निर्णयांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी शासन स्तरावर दि.१५/०५/२०१५ रोजी आयोजित बैठकीत निवड आधारित श्रेयांक प्रणाली संदर्भात (Choice Based Credit System) चर्चा होवून सन २०१५-१६ पासून सर्व अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयात लागू करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

वरीलप्रमाणे कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने सोलापूर विद्यापीठात सर्व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य, स्थायी/अस्थायी अभ्यासमंडळाचे अध्यक्ष व सर्व विद्याशाखांचे अधिष्ठाता आणि विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलाचे संचालक, शिक्षक व अधिकारी यांची दि.२५ मे, २०१५ रोजी सकाळी ११:०० ते ०५:०० या दरम्यान विद्यापीठ सभागृहात विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांना निवड आधारित श्रेयांक प्रणाली (Choice Based Credit System) लागू करण्याबाबत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत साधन व्यक्ती म्हणून राज्यातील डॉ.आर.डी.कपले प्राध्यापक, भूशास्त्र संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड तसेच परराज्यातील डॉ.वाय.एम.जयराज सेवानिवृत्त प्राध्यापक, गुलबर्गा विद्यापीठ, गुलबर्गा यांनी मार्गदर्शन व पीपीटीव्दारे प्रात्यक्षिके दाखविली.

सदर कार्यशाळेत संलग्नित महाविद्यालयातील उपस्थित प्राचार्य व स्थायी / अस्थायी अभ्यासमंडळाचे अध्यक्ष यांनी शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून सर्व विद्याशाखेच्या पदवी वर्गास (UG) निवड आधारित श्रेयांक प्रणाली लागू करणे शक्य होणार नाही कारण आत्ताच म्हणजे सन २०१४-१५ पासून श्रेयांक पध्दत (CGPA) पदवी वर्गास लागू करण्यात आली आहे. ती संबंधित विद्यार्थी व शिक्षक यांना पूर्णपणे कळालेली नाही. अशातच निवड आधारित श्रेयांक प्रणाली (CBCS) लागू केल्यास विद्यार्थी व शिक्षकांत संभ्रम व गोंधळाचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच तांत्रिक अडचणीमुळे (बिंदू नामावली तपासून न मिळाल्यामुळे) महाविद्यालयातील शिक्षकांची मोठया संख्येने पदे भरण्याचे प्रलंबित आहे. त्यासाठी सर्व विद्याशाखांच्या पदवी वर्गांना अभ्यासक्रमातील निवड पध्दतीनुसार निवड केलेले विषय शिकविण्यासाठी शिक्षक उपलब्ध नाहीत. तसेच एखाद्या महाविद्यालयात फक्त एकच विद्याशाखेचे पदवी व पदव्युत्तर कोर्स सुरू आहेत. अशा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना Choice कशाप्रकारे द्यावी असा प्रश्न प्राचार्यांनी उपस्थित केला आहे. त्यामुळे निवड आधारित श्रेयांक प्रणाली लागू करणे शक्य नाही असेही उपस्थितांनी सांगितले.

म्हणून विद्यापीठाने प्रथमत: विद्यापीठ परिसर व संलग्नित महाविद्यालयाच्या सर्व विद्याशाखांच्या पदव्युत्तर वर्गास शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून निवड आधारित श्रेयांक प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे आणि पदवी अभ्यासक्रमासाठी शै.वर्ष २०१६-१७ पासून निवड आधारित श्रेयांक प्रणाली लागू करण्याबाबत विद्यापीठाने भूमिका ठरविली आहे. सदरची बाब विद्यापीठाने पत्र क्रमांक-एसयुएस/बीओएस/२४३७, दि.१६ जून, २०१५ अन्वये शासनास कळविले आहे. सोबत शासनास कळविलेल्या पत्राची प्रत व दि. २५ मे, २०१५ रोजी झालेल्या कार्यशाळेच्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सूलभ संदर्भासाठी जोडली आहे.

सबब, वरीलप्रमाणे जे.बी.व्ही.सी.च्या बैठकीतील निर्णयांच्या अनुषंगाने निवड आधारित श्रेयांक प्रणाली (Choice Based Credit System) लागु करण्यासंदर्भात प्रस्तुत विद्यापीठाने केलेल्या कार्यवाहीची बाब माहितीस्तव).

| ठराव : | **मा. कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |
|---|---|



Scanned by CamScanner

# Solapur University, Solapur

No. SUS/BoS//2015-16/4780

Date: 19th Aug., 2015.

(Circular)

The Principals of all Arts, Commerce, Science, Law, Education and Engineering colleges affiliated to this University and Directors of the Schools in the University are hereby being informed that Govt. of Maharashtra has arranged a meeting on 15/05/2015 to take review for implementation of resolutions made during the meeting of J. B. V. C. held at Rajbhavan, Mumbai on 23/02/2015. It is decided during that meeting that the Choice Based Credit System should be implemented from academic year 2015-16 in all non agricultural Universities and affiliated colleges.

As per the guidelines from Govt. of Maharashtra dated 15/05/2015, the University has arranged a workshop in the Campus to discuss about the Choice Based Credit System and how to implement the same for Principals, Chairpersons of Boards of Studies, an Deans of all Faculties and Directors of all Schools in the University campus, teacher and officers on 25th May 2015. In this workshop Dr. R. D. Kapale from School of Earth Sciences, Swami RamanandTirthMarathwada University and Dr. Y. M. Jayraj Ex-Professor from Gulbarga University, Gulbarga guided the participants.

For implementation of the Choice Based Credit System from academic year 2015-16, a meeting of all Deans and administrative officers was held under president ship of Hon'ble Vice Chancellor on 23/06/2015 at 2.30 pm in the University.

In this meeting it is decided that the Choice Based Credit System must be implemented for first year of all P.G. courses and accordingly syllabus structure should be modified in70-30 pattern.

Scanned by CamScanner

This circular should be brought to the notice of all teachers, administrative staff and students of your college fro implementation of the Choice Based Credit System smoothly.

Signed/-
(R. Y. Patil)
Incharge Registrar

Outward No. SUS/BOS Dept./ 4780/ 2015.
Date: 19th August, 2015.
Copy for information and smooth implementation:

1. Principals, all Arts, Commerce, Science, Education, Law and Engineering Colleges affiliated to Solapur University, Solapur.
2. All Directors, Schools in the University.

Copy for information:

1. Vice Chancellor's Office.
2. Registrar's Office.
3. Director, BCUD, Solapur University, Solapur.
4. Controller of Exams, Solapur University, Solapur.
5. Finance and Audit Officer, Solapur University, Solapur.
6. Official Departments.

PRINCIPAL
D.B.F. DAYANAND COLLEGE
ARTS & SCIENCE, SOLAPUR.

Scanned by CamScanner

1.2.2. CBCS


सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्ग,
केगांव, सोलापूर-४१३ २५५.
दुरध्वनी क्र-२१७-२७४४७७८.
फॅक्स क्र-०२१७-२७४४७७८.

SOLAPUR UNIVERSITY
Solapur-Pune National Highway,
Kegaon, Solapur-413 255.
Phone No.0217-2744778
Fax No.091-0217-2744778


संदर्भ क्रमांक-सोविसो/अभ्यासमंडळे /२०१५-१६/ 4780

दिनांक. /८/२०१५.

1 9 AUG 2015

(परिपत्रक)

प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित सर्व कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र व अभियांत्रिकी महाविद्यालयांचे प्राचार्य व विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलाचे संचालक यांना कळविण्यात येते की, दि.२३/०२/२०१५ रोजी राजभवन, मुंबई येथे झालेल्या जे.बी.व्ही.सी.च्या बैठकीतील निर्णयांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दिनांक १५/०५/२०१५ रोजी बैठक आयोजित केली होती. सदरील बैठकीत निवड आधारित श्रेयांक प्रणाली (Choice Based Credit System) लागू करण्याबाबत सखोल चर्चा करुन त्याची अमंलबजावणी सन २०१५-१६ पासून सर्व अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयात करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासनाने दिनांक १५/५/२०१५ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासाठी सोलापूर विद्यापीठात सर्व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य, स्थायी/अस्थायी अभ्यासमंडळाचे अध्यक्ष व सर्व विद्याशाखांचे अधिष्ठाता आणि विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलाचे संचालक, शिक्षक व अधिकारी यांची दि.२५ मे, २०१५ रोजी विद्यापीठ सभागृहात विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांना निवड आधारित श्रेयांक प्रणाली (Choice Based Credit System) लागू करण्याबाबत व सदर निवड आधारित श्रेयांक प्रणाली कशी राबवावी याबाबत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत साधन व्यक्ती म्हणून डॉ.आर.डी.कपले प्राध्यापक, भूशास्त्र संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड तसेच डॉ.वाय.एम.जयराज सेवानिवृत्त प्राध्यापक, गुलबर्गा विद्यापीठ, गुलबर्गा यांनी मार्गदर्शन केले.

वरील निर्णयाच्या अनुषंगाने निवड आधारित श्रेयांक प्रणाली (Choice Based Credit System) शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून लागू करण्यासंदर्भात चर्चा करण्यासाठी मा.कुलगुरु महोदयांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक २३/६/२०१५ रोजी दुपारी ०२.३० वा विद्यापीठामध्ये सर्व विद्याशाखेंचे अधिष्ठाता व संवैधानिक अधिकारी यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदरच्या बैठकीत शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षास निवड आधारित श्रेयांक प्रणाली (Choice Based Credit System) लागू करुन सर्व विद्याशाखेच्या अभ्यासक्रमाचा आराखडा (Structure) ७०-३० प्रमाणे ठेवण्यात यावा असा निर्णय घेण्यात आला.

ATTESTED COPY
PRINCIPAL
D.B.F. DAYANAND COLLEGE OF
ARTS & SCIENCE, SOLAPUR.

Scanned by CamScanner

वरीलप्रमाणे निवड आधारित श्रेयांक प्रणाली (Choice Based Credit System) लागु करण्यासंदर्भात झालेल्या निर्णयाची माहिती आपल्या महाविद्यालयातील संबंधित शिक्षक, प्रशासकीय अधिकारी/कर्मचारी व विद्यार्थी यांच्या निदर्शनास आणून देवून त्यानुसार कार्यवाही करण्याबाबत सर्व संबंधीतांना सुचित करावे.

(आर.वाय.पाटील)
प्रभारी कुलसचिव

जा.क्र.सोविसो/अभ्यासमंडळे विभाग/ ४८८० /२०१५.
दिनांक :- ऑगस्ट,२०१५. 19 AUG 2015

<u>प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी</u>

१) प्राचार्य, सोविसो संलग्नित सर्व कला,वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी व विधी महाविद्यालये
२) सर्व संकुलाचे संचालक, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

प्रत माहितीसाठी

१. कुलगुरु कार्यालय,
२. कुलसचिव कार्यालय,
३. मा.संचालक, बीसीयुडी, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.
४. मा.परीक्षा नियंत्रक, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
५. मा. वित्त व लेखाधिकारी, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
६. मा.संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, सोलापूर विद्यापीठ,सोलापूर.
७. कार्यालयीन नस्ती.

D.B.F. DAYANAND COLLEGE OF ARTS & SCIENCE, SOLAPUR

ATTESTED COPY
PRINCIPAL
D.B.F. DAYANAND COLLEGE OF
ARTS & SCIENCE, SOLAPUR.

Scanned by CamScanner